# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर



OW/ DCP TRAFFIC THN /ADM/ NOTIFACTION / 56 /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :--23112017
दुरध्वनी कमांक 022- 25401056

1486
23/11/17

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

ठाणे शहरातील नागरीकाकरीता टाईम्स ऑफ इंडिया ग्रुपच्या वतीने ग्लॅडी अल्वारीस रोडवर दि.२६/११/२०१७ ते दि. ११/०२/२०१८ या दरम्यान दर रविवारी हॅप्पी स्ट्रीट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येत नागरीक सहभागी होणार असल्याने सदर ठिकाणी व परिसरातील वाहतुक सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.--११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित का.काळे, पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:--

१) हिरानंदानी मिडॉस ,पवारनगर, लोक हॉस्पिटल व इतर भागातून टिकुजीनीवाडी -- मानपाडा बाजुकडे जाणाऱ्या लोक हॉस्पिटल चौक ते हॅप्पी व्हॅली चौक दरम्यान जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांसाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :-- सदरची वाहने हिरानंदानी मिडॉस ,पवारनगर,वसंत विहार सर्कल कडून डॉ.काशिनाथ घाणेकर नाटयगृह चौक ते हॅप्पी व्हॅली मार्गे टिकुजीनीवाडी --मानपाडा बाजुकडून येणाऱ्या एकाच वाहीनीवरून जातील.

लोक हॉस्पिटल चौक ते हॅप्पी व्हॅली चौक या दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास मनाई (No Parking) करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना दि. २६/११/२०१७ ते दि.११/०२/२०१८ रोजीचे दरम्यानच्या दर रविवारी सकाळी ०५.०० ते ११.०० वा.दरम्यान लागू राहिल. सदरची अधिसुचना पोलीस वाहने ,रूग्णवाहीका,फायरब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहनाना लागू राहणार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/-- सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :--
प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे/ विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
पोलीस उपायुक्त, परिमंडळ--५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

प्रत:-- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/-- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :-- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/-- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :-- सपोआ वाहतूक विभाग, ठाणे /पोनि कासारवडवली वाहतूक उपविभाग.
२/-- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.